नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०५/२०२५ (रविवार)**

---

## जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना केली २४ तासांच्या आत अटक
## पोलीस स्टेशन कळमेश्वर व काटोल ची संयुक्त कामगीरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दि. ०२/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे आस्तिक देवनाथ कुमेरिया वय २४ वर्षेरा. कबरपिपलातह. सौसर (म.प्र.) ह.मु. कळमेश्वर हे दुपारी ०१.१५ वा. सुमारास त्यांच्या मोटर सायकल ने चिचभवन येथून कळमेश्वर कडे येत असतांना कळमेश्वर येथील मेटलॉक कंपनी जवळील उडडाणपुलाचे वर दोन मोटारसायकल वर डबलसिट आलेल्या अनोळखी इसमांनी फिर्यादीला अडवून पिस्टलचा धाक दाखवून फिर्यादी कडील बॅग ज्यामध्ये रिकव्हरीचे ७२२०/— रू., सीडीटी अमाउंट ३३५ रू. लिनोवो कंपनीचा टॅब, बायोमॅट्रीक मशीन व इतरकागदपत्रे असलेली बॅग जबरीने हिसकावून घेवून पसार झाले, अशी फिर्यादि यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे येवून तक्रार दिल्याने त्यांचे फिर्यादि वरून अनोळखी चार आरोपींविरूध्द कलम ३०९(४), ३(५) बीएनएस सहकलम ३+२५ आर्म्स ॲक्ट नुसार पो.स्टे. कळमेश्वर येथे गुन्हा नोंद करण्यात आला व आरोपीच्या शोधकामी मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक,ना.ग्रा, श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक ना.ग्रा., श्री. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर यांचे मार्गदर्शनात पोनि श्री. मनोज काळबांडे ठाणेदार पो.स्टे. कळमेश्वर व पोनि श्री. निशांत मेश्राम, ठाणेदार, पो.स्टे. काटोल यांच्या नेतृत्वात दोन तपास पथक तयार करून आरोपीच्या शोध कामी रवाना करण्यात आले. तपाथ पथकातील पोलीसांनी अथक परिश्रम घेवून गुन्ह्यातील चारहि आरोपीतांना निष्पन्न करून अवघ्या चोवीस तासांच्या आत काटोल तसेच डोंगरगाव जंगल परिसरातून आरोपींना ताब्यात घेवून दि. ०३/०५/२०२५ च्या ००:५४ वा. अटक करून आरोपींकडून गुन्ह्यात चोरी केलेली रक्कम व मुद्देमाल तसेच

आरोपींनी गुन्ह्यात वापरलेल्या मोटार सायकल जप्त करण्यात आलेले आहे. गुन्ह्यात निष्पन झालेले अटक आरोपींची नावे **१) दिनेश मधुकरपवार वय २४ वर्षे रा. डोंगरगाव तह. काटोल २) दिनेश तेजराम मारवाडी वय २० रा. डोंगरगाव तह. काटोल ३) सुर्यवंशी राजा राजपुत वय २२ वर्षे रा. डोंगरगाव तह. काटोल ४) नागेश ज्ञानेश्वर पवार वय २६ वर्षे रा. शेषनगर हिंगणा** अशी आहेत. सदर आरोपींना निष्पन करून ताब्यात घेण्याची कार्यवाहि मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक,ना.ग्रा, श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक ना.ग्रा., श्री. अनिल म्हस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सावनेर यांचे मार्गदर्शनात पोनि श्री. मनोज काळबांडे ठाणेदार पो.स्टे. कळमेश्वर , पोनि श्री. निशांत मेश्राम, ठाणेदार, पो.स्टे. काटोल, पो. शि. गौरव बखाल ब.न. २३०७ पो.स्टे. काटोल तसेच पो.स्टे. कळमेश्वर येथील पोलीस स्टॉफ स.फौ. सुनील मिश्रा ब.न. ४६७, पो.हवा. प्रजोक तायडे ब.न. १९४६, पो.ना. अनिस शेख ब.न. ५३०, पो.शि. निखील मिश्रा ब.न. ३३, पो.शि. विवेक गाडगे ब.न. १४१६, पो.शि. अभयसिंग ठाकुर ब.न. ४४९ यांनी केली. गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सविता वड्डे, पो.स्टे. कळमेश्वर या करित आहेत.

## अंमलीपदर्थ गांजा विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा नोंद, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई ( रू. १३,९२५ च्या मुद्देमालासह १ आरोपी अटक)

**स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा.** :— दिनांक ०३/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि राजगुरू हे पोलीस पथकासह पो.स्टे. कळमेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, **गोन्ही शिवारातील उड्डान पुला खाली** आनंद वर्मा व गोलू वर्मा हे त्यांच्या पानठेल्यामध्ये अंमली पदार्थ गांजा बाळगुन गांजाची विक्री करत आहेत. मिळालेल्या महीतीच्या आधारे स्था.गु.शाखेच्या पथकाने सापळा रचून एन.डी.पी.एस. कायद्याच्या तरतुदिनुसार पंचासमक्ष घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे १) आनंद देवशंकर वर्मा वय ३० वर्ष व २) गोलु वर्मा दोन्ही रा. वार्ड क्र ०१ येरला हे अंमली पदार्थ गांजा ताब्यात बाळगून विक्री करतांना प्रत्यक्ष मिळून आले. आरोपी क्रं. २ गोलू वर्मा हा पोलीसांना पाहून घटनास्थळावरून पळून गेला. घटनास्थळाची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून

पानठेल्याच्या खाली एका काळ्या रंगाच्या प्लास्टीक थैली मधे गुंगीकारक वनस्पती ओलसर गांजा ज्याचे निव्वळ वनज ३९२ ग्रॅम किंमती ३९२५/— रूपये व एक सॅमसंग कंपनीच्या अॅन्ड्रॉईड मोबाइल किं १०,०००/— रूपये असा एकुण १३,९२५/— रूपयाचा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष मुद्देमाल जप्त करून आरोपीविंरूध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम ८(ब),२०(ठ) IIA गुंगीकरण औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे प्रदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी नामे **आनंद देवशंकर वर्मा वय ३० वर्ष रा. वॉर्ड क्रं. ०१, येरला याला अटक करण्यात आलेली असून फरार आरोपी गोलु वर्मा रा. वार्ड क्र ०१ येरला याचे शोध सुरू आहे.** गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि सविता वड्डे पो.स्टे. कळमेश्वर हे करित आहेत.

नमूद कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक,ना.ग्रा, श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक ना.ग्रा., यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि जिवन राजगुरू, स.फौ. निलेश बर्वे, पोहवा रोहन डाखोरे, संजय बांते व प्रमोद तभाने यांनी केली.

## अवैधरित्या देशी , मोहफुलाची दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई
## एकूण ४ आरोपीविरूध्द ४ गुन्हे नोंद. एकूण ३५९५ /— रू. चा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०३/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. नरखेड हद्दीतील **मौजा मोहदी दळवी** या ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे अवैधरित्या देशी दारू बाळगुन विक्री करणारा **आरोपी नामे ज्ञानेश्वर बीसना श्रिराम वय ३६ वर्ष रा. मोहदी दळवी तह. नरखेड** याचे वर छापा टाकूण एकूण कि. ४९०/— रू. ची देशी दारू संत्रा जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ०३/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कोंढाळी येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. कोंढाळी हद्दीतील **मौजा दुधाळा** या ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या

आधारे अवैधरित्या देशी दारू बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **कैलाश शेषराव राठोड वय ३२ वर्ष रा.पुसागोंदी** याचे वर छापा टाकूण एकूण कि. ३८५/— रू. ची देशी दारू संत्रा जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०३/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. पारशिवनी हद्दीतील **मौजा नवेगाव खैरी शिवारातील वडाचे झाडाखाली** या ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे अवैधरित्या मोहफुलांची गावठी दारू बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **अमर अच्छेलाल नैताम वय ३४ वर्ष रा. शिलादेवी त. पारशिवनी** याचे वर छापा टाकूण एकूण कि. २०००/— रू. ची मोहफुलांची गावठी दारू जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०३/०४/२०२५ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील पोलीस स्टॉफ ने पो.स्टे. मौदा हद्दीतील **मौजा सावळी फाटा** या ठिकाणी मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे अवैधरित्या देशी दारू बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **अशोक सुर्यभान बारसागडे वय ४८ रा. सावळी फाटा** याचे वर छापा टाकूण एकूण कि. ७२०/— रू. ची देशी दारू संत्रा जप्त करून आरोपींविरूध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**(अशाप्रकारे एकूण ०४ आरोपीविरूध्द ०४ गुन्हे नोंद व एकूण ३५९५ /— रू. चा मुद्देमाल जप्त)**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**